स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

संशोधन आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवीकरिता सादर करण्यात येणारा शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

महाराष्ट्र विधिमंडळातील मातंग समाजाच्या नेतृत्वाचा चिकित्सक अभ्यास विशेष कालखंड :२००४ ते २०१४

संशोधक

भोईवार हरिदास मरीबा

संशोधन केंद्र ,

पीपल्स कॉलेज, नांदेड.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. प्रताप पाटील

विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक,

राज्यशास्त्र विभाग,

बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत

इ.स. २०१६

महाराष्ट्र विधिमंडळातील मातंग समाजाच्या नेतृत्वाचा चिकित्सक अभ्यास : विशेष कालखंड २००४ ते २०१४

व्यक्तीला एक मनुष्य म्हणून जीवन जगण्यासासाठी व त्याचा सर्वागीण विकास होण्यासाठी त्याला व्यक्तीस्वातंत्र्य मिळणे अपेक्षित आहे.असे व्यक्तीस्वातंत्र्य लोकशाहीमध्ये प्राप्त होते. दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक राष्ट्रांनी लोकशाही शासनप्रणालीचा स्वीकार केला तो या कारणास्तवच. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात व मध्ययुगीन, प्राचीन कालखंडामध्ये भारतातील सामान्य व्यक्तीला कुठल्याही प्रकारचे स्वातंत्र्य प्राप्त नव्हते. राजे संस्थानिक,वतनदार लोक यांच्या हातात सत्ता कैंद्रित झालेली होती. सामान्य लोक केवळ त्यांच्या आदेशाचे पालन करी. प्राचीन भारतीय समाजामध्ये वर्णव्यवस्थेनुसार ब्राम्हण,क्षत्रिय,वैश्य,शुद्र असे चार वर्ण अस्तित्वात होते.तद्नंतर या वर्णातुनच जातीची उत्पत्ती झाली.भारतीय समाज शेकडो जातीमध्ये विभागला गेला. यामध्ये ज्या क्षुद्र जाती होत्या त्यांना अतिशय ह्लाकीचे जीवन जगावे लागत. प्राचीन कालखंडापासून ते स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत यांचे अखंडितपणे शोषण सुरु होते.

यांच्या उद्धाराचे प्रयत्न झालेच नाहीत अश्यातली बाब नाही गौतम बुध्द, संत कबीर,संत तुकाराम महाराज,छ.शिवाजी महाराज, छ.शाहू महाराज, म.फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या अशा अनेक महामानवानी शोषणमुक्त समताधिष्टीत समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्याचे हे प्रयत्न वाया गेले अशातली बाब नाही पण आजपर्यत समताधिष्टीत समाज निर्माण होऊ शकला नाही ही वास्तविक परिस्थिती आहे.

स्वात्तत्र्यप्राप्तीनंतर भारतीय शासनाने स्वातंत्र्य, समता, न्याय, बधुता, प्रजासत्ताक, धर्मनिरपेक्षता ही तत्वे स्वीकारली भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेतच तसे नमूद करण्यात आले आहे. भारतीय समाजाचे निरीक्षण करता आपणास खेदाने हे मुल्ये पूर्णपणे भारतीय समाजात प्रस्थापित झाली नाहीत. भारतीय संघराज्याने स्वीकारलेली लोकशाही ही संसदीय लोकशाही आहे. म्हणजेच जनता ही आपल्या मताच्या माध्यमातून आपले म्हणणे सभागृहात मांडण्यासाठी आपला प्रतिनिधी पाठवत असते. पण येथे गफलत ही होते ज्या विचारधारेचे,समाजघटकाचे मताधिकार जास्त त्याचेच प्रतिनिधी निवडले जातात. उदा : महाराष्ट्राचा विधानसभा मतदार संघाचा विचार करता खुल्या प्रवर्गातून जास्तीत जास्त मराठा उमेदवारच निवडून येतात. मग प्रश्न उरतो जे मताने अल्पसंख्याक आहेत किवा ज्यांच्या मताचे संघटन नाही. अशा समाजघटकांचे प्रतिनिधी सभाग्रहात कसे जातील ही बाब डॉ.बाबासाहेब आबेंडकररांनी स्वांतत्र्यपूर्व कालखंडातच हेरली होती आणि म्हणूनच त्यांनी

स्वंतत्र मतदार संघाची मागणी केली होती. राष्टीय एकात्मतेच्या प्रश्नामुळे ती मागणी पूर्ण होऊ शकली नाही मग विधिमंडळात जागा आरक्षित ठेवण्याचा उपाय त्यावर करण्यात आला. त्यावर मग स्वातंत्र्यप्राप्तीपासून कैंद्रीय व राज्यविधिमंडळात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी जागा आरक्षित ठेवल्या जातात. महाराष्ट्राच्या विधिमंडळात अनुसूचित जमातीसाठी २२ व अनुसूचित जातीसाठी २९ जागा राखीव आहेत.

विधिमंडळात आरक्षित जागा ठेवल्यामुळे अशा दलित व आदिवाशींचे प्रतिनिधी विधिमंडळात पोहचण्यास मदत झाली आहे. विधिमंडळात जागा ठेवल्या व त्यांमाध्यमातून मागास जातीचे प्रतिनिधी सभागृहात गेले म्हणून सामाजिक,राजकीय न्याय प्रस्थापित होण्यास मदत झाली ही बाब बरोबर असली तरी मागास जातीला निवडून देणारे बहुसंख्य हे इतर जातीतील असतात. पक्ष संघटना तिकीट देताना कोण कोणत्या बाबीचा विचार करते. निवडणुकीत होणारी प्रचंड आर्थिक उलाढाल सवर्णांची जाणीवपूर्वक विशिष्ट जातीला दिली जाणारी पसंती, निवडणूक येण्यासाठी केले जाणारे जात, धर्माचे राजकारण व त्यांतर सभागृहात पोहचल्यानंतर आपली भूमिका बजावताना येणारा पक्षाचा दबाव उमेदवार, अपक्ष म्हणून निवडून आलेल्या सदस्यांच्या समस्या, संसदीय कामकाजासंबधी त्याचे ज्ञान मतदार संघाच्या समस्या याबदल असलेला त्याचा अभ्यास पक्षा ची विचारधारा, जनतेचे हित, समस्या व त्याचे स्वतः चे हितसंबंध याची सांगड ते कसे घालतात. यासंबंधाने विचार करणे हे प्रत्येक राज्यशास्त्राच्या अभ्यासकाचे व संशोधकाचे कर्तव्य ठरते.

अनुसूचित जाती या प्रवर्गाचा विचार करता महाराष्टाच्या एकूण लोकसंख्येच्या १०%त्यांचे प्रमाण आहे.या प्रवर्गात एकूण ५८ जाती येतात. अनुसूचित जाती अंतर्गत प्रमाणाचा विचार करता.यामध्ये महार (नव बौध्द)३५ %, मांग ३३ % उरलेल्या ५६ जातीची लोकसंख्या ३३ %आहे.पण या सर्व जातींना समप्रमाणात न्याय मिळतो का ? मातंग प्रतिनिधी सभागृहात जाऊन योग्य प्रकारे भूमिका बजावतात का ? मातग प्रतिनिधी निर्भीडपणे आपले कर्तव्य पार पडतात का ? पक्षश्रेष्ठीचा दबावाला बळी पडतात का ? या सर्व प्राप्त परिस्थितीच्या अनुषंगाने महाराष्ट्राच्या विधिमंडळातील मातग नेतृत्वाचा चिकित्सक अभ्यास इ.स .२००४ ते २०१४ हा संशोधन विषय अभ्यासासाठी उपयुक्त ठरतो.

संशोधन विषयाची निवड :

राजकीय व्यवस्थेची जी आदान, प्रदान व प्रत्यादान म्हणजेच लोकमत जाणून घेण्याचे कार्य राजकीय व्यवस्थेला करावे लागते. जनमत जरी वतृपत्र,

प्रसारमाध्यमे या सारख्या व इतर माध्यमातून शासनापर्यंत पोहचत असले तरी थेट शासनापर्यंत जनमत पोहचवण्याचे कार्य लोकप्रतिनिधी करत असतात. शासनाच्या चुकीच्या धोरणाची प्रत्यक्ष विचारणा ही प्रश्नोत्तराच्या तासात प्रतिनिधी सभागृहात करू शकतात त्यांची ही भूमिका संशोधनाचा विषय आहे.

मातंग प्रतिनिधी विषयी विचार करत असताना आज ही महाराष्टात दलित अत्याचाराची प्रकरणे घडतात. मातंग समाजाकडून स्वतत्र ८ % आरक्षणाची मागणी होत आहे या संदर्भाने प्रतिनिधी काय भूमिका घेत आहेत हा या संशोधनाचा विषय आहे.

मातंग प्रतिनिधी किती प्रभावीपणे आपल्या मतदार संघाविषयी व राज्यातील ज्वलंत प्रश्नाविषयी सभागृहात आवाज उठतात ? हा ही एक संशोधनाचा पैलू आहे. इतर सवर्ण प्रतिनिधींच्या तुलनेत त्याची राजकीय संपादणूक किती प्रमाणात आहे. हे जाणून घेणे ही संशोधन निवडीचे कारण आहे.मातंग प्रतिनिधी व राजकीय पक्ष व मतदार संघातील लोक यांचे एकमेकाशी असलेले राजकीय वर्तन कोणत्या प्रकारचे आहे. महाराष्ट्रात आज जे मातंग समाजाचे नेतृत्व दिसते आहे त्यांना जनाधार आहे की ते केवळ पक्षानी निर्माण केलेले नेतृत्व आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात मातंग समाजावर संशोधन झाले असले तरी मातंग नेतृत्वावर व विधिमंडळातील मातंग समाजाच्या नेतृत्वाच्या अनुषंगाने संशोधन झालेले आढळून आले नाही हे ही विषय निवडीचे कारण आहे.

संशोधन समस्या :

विधानसभा राखीव मतदार संघामुळे मातंग समाजाचे नेतृत्व राज्य विधिमंडळात नेतृत्व करत आहे ही मोठी उपलब्धी आहे. पण ते खरोखरच आपल्या अधिकाराचा प्रभावीपणे वापर करतात का ? कार्यकारी मंडळामध्ये त्यांना स्थान मिळते का ? समित्यावर कार्य करण्याची संधी त्यांना प्राप्त होते का ? ही संशोधन समस्या आहे. मातंग प्रतिनिधी जेव्हा सभागृहात एखादी भूमिका मांडतात . तेव्हा त्यांना कसा प्रतिसाद मिळतो मातंग समाजाचे नेतृत्व निर्भीड,स्पष्टवक्तेपणा असलेले आहे ,की पक्षाच्या आदेशाचेच पालन करते. मातंग समाजाचे हे नेतृत्व राखीव जागा आहेत म्हणून विधानसभेत जाते पण खरोखरच आपल्या कार्य कर्तत्वाने एक प्रगल्भ नेता म्हणून पुढे येतो का? येत नाहीत तर त्यावर काय मर्यादा आहेत ही संशोधनाची समस्या आहे.

संशोधनाची उदिष्ट्ये :

१. विधिमंडळातील मातंग नेतृत्वाच्या कार्याचा अभ्यास करणे.
२. विधिमंडळातील मातंग नेतृत्व व त्याच्या मतदार संघातील त्यांच्या व मतदाराच्या राजकीय वर्तुनुकीचा अभ्यास करणे
३. मातंग लोकप्रतिनिधी व राजकीय पक्ष यांच्यातील संबंधाचा अभ्यास करणे
४. मातंग नेतृत्वाचा त्यांच्या मतदार संघातील विकास कार्यातील योगदानाचा अभ्यास करणे.
५. मातंग नेतृत्वाच्या राजकीय संपादनुकीवर प्रभाव टाकणारे घटक शोधून अभ्यास करणे

६) मातंग नेतृत्वासमोरील समस्याचा अभ्यास करणे

संशोधन गृहितके :

१. आरक्षण धोरण मातंग समाजाचे नेतृत्व विधिमंडळात पोहचण्यास कारणीभूत आहे
२. मातंग नेतृत्व सामाजिक चळवळीतून पुढे आलेले आहे.
३. मातंग प्रतिनिधीच्या कार्य व भूमिकेवर त्याच्या पक्षीय भूमिकेचा दबाव दिसून येतो.
४. मातंग प्रतिनिधींना पक्षाची उमेदवारी देताना त्याच्या सामाजिक कार्यापेक्षा त्यांच्या आर्थिक स्थितीला महत्त्व दिले जाते.
५. मातंग प्रतिनिधी असलेल्या मतदारसंघाच्या विकास कार्यात गुणात्मक प्रगती घडून आलेली नाही
६. मातंग नेतृत्वाला कार्य करताना अनेक मर्यादा पडतात

संशोधनाचे महत्त्व :

१. मातंग नेतृत्वाचा विधिमंडळातील सहभागाच्या पातळीचा शोध घेऊन त्यातील समस्या जाणून घेऊन त्यावर उपाय करण्याच्या दृष्टीने हा अभ्यास विषय महत्त्वाचा आहे.

२. विधिमंडळातील मातंग नेतृत्वाने जे कार्य केलेले आहे ते इतरासमोर येऊन इतरांना दिशादर्शन करण्याच्या दृष्टीने हा अभ्यास विषय महत्वाचा आहे

३.विधिमंडळातील मातंग नेतृत्वाचा अभ्यास करत असतानाच संसदीय कामकाजाच्या सखोल अभ्यास करण्याच्या दृष्टीने हा अभ्यास विषय महत्त्वाचा आहे

४.पक्ष,जात राखीव मतदार संघ या संबधाने होणारे राजकारण विस्तृत पणे जाणून घेण्याचा दृष्टीने हा अभ्यास विषय महत्वाचा आहे

५.लोकनिर्वाचित उमेदवार किती प्रमाणात लोकाच्या आकांक्षा पूर्ण करतात हे जाणून घेण्याच्या दृष्टीने हा अभ्यासविषय महत्वाचा आहे

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

संबंधित संशोधन विषय २००४ ते २०१४ या कालखंडात महाराष्ट्र विधानसभेत ज्या प्रतिनिधींनी कार्य केलेले आहे त्याच्या कार्याचा अभ्यास करणारा आहे त्यामुळे या कालखंडाच्या अगोदर व नंतर ज्या मातंग लोकप्रतिनिधीनी विधिमंडळात कार्य केलेले आहे त्यांच्या यामध्ये समावेश नाही याशिवाय अनुसूचित जातीतील व अनुसूचित जमातीतील इतर जातीतील विधानसभा सदस्यांच्या कार्याचा अभ्यास यामध्ये करण्यात आलेला नाही ग्राम पंचायत, जिल्हा परिषद, केंद्रीय स्तरावरच्या मातंग नेतृत्वाचा यामध्ये समावेश नाही. मातंग समाजाचे जी राजकीय नेतृत्व संस्था,संघटना,चळवळ यामध्ये कार्यरत आहेत त्यांचा अभ्यास विषय अंतर्गत करण्यात आलेला नाही. त्यामुळे विधिमंडळातील जे मातंग नेतृत्व आहे त्याच्याच अभ्यास या अंतर्गत करण्यात आल्रला आहे ही संशोधनाची व्याप्ती व मर्यादा आहे.

संशोधन पद्धती :

प्रस्तूत संशोधनासाठी समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. यामध्ये ऐतिहासिक, विश्लेषणात्मक,वर्णनात्मक, तुलनात्मक सशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. सदरील सशोधन कार्यात क्षेत्रकार्याचा ही आंतर्भाव असल्यामुळे प्रश्नावली, अनुसूची, मुलाखत ही सशोधन तत्रे ही वापरण्यात येतील.मातंग समाजाचा पूर्व इतिहास व राजकीय इतिहास जाणून घेण्यासाठी ग्रंथालयातील संदर्भासाठी आधार घेण्यात आला आहे.

तथ्य संकलन पद्धती :

प्रस्तूत संशोधन करण्यासाठी दोन प्रकारच्या तथ्याचे संकलन केले जाईल.

अ)प्राथमिक तथ्य:

प्राथमिक तथ्यामध्ये मातंग समाजाच्या विधानसभा सदस्यांनी त्यांच्या कार्यकाळात सभागृहात जे प्रश्न मांडले ज्या भूमिका घेतल्या त्या संदर्भाने कामकाजाच्या लिखित प्रति

आहेत त्याच्या आधार घेण्यात येईल. प्रत्यक्ष विधानसभा सदस्याची भेटून त्याची मुलाखत, प्रश्नावली इत्यादी माध्यमातून तथ्य संकलीत केली जातील.

ब) व्दितीयक तथ्य :

वर्तमानपत्रे,मासिके, त्रैमासिके, साप्ताहिके, नियतकालिके यामधून विधिमंडळ सदस्याच्या कार्य व भूमिका विषयी जे लिखाण झाले आहे त्याचा ही आधार घेण्यात येईल.याशिवाय विधिमंडळ सदस्याच्या कार्याविषयी राजकीय विचारवंतांनी जे लिखाण केलेले आहे त्यांचा समावेश व्दितीय स्त्रोतामध्ये करण्यात आलेला आहे.

प्रकरणाची मांडणी :

प्रकरण पहिले : प्रस्तावना व विषय प्रवेश :

प्रस्तूत प्रकरणात संशोधन विषयाची प्रास्ताविक मांडणी असेल यामध्ये संशोधनाची विषयाची निवड का केली ? सदरील संशोधनाची उदिष्ट्ये व ग्रहितकृत्ये काय आहेत. सदरील संशोधन पूर्ण करण्यासाठी कोणती संशोधन पद्धती वापरण्यात येईल. या सशोधनाचे व्याप्ती व मर्यादा व महत्त्व याचे प्रतिपादन करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : विधिमंडळ कामकाज स्वरूप व व्याप्ती

विधिमंडळतील मातंग नेतृत्वाच्या कार्याचा अभ्यास करत असताना विधिमंडळ कामकाजाचे स्वरूप काय आहे.विधिमंडळ कामकाजाची व्याप्ती किती आहे.हे समजून घेणे महत्वाचे ठरते म्हणून संशोधकाने हे दुसरे प्रकरण या प्रबंधा अंतर्गत लिहले आहे.

प्रकरण तिसरे : राजकीय नेतृत्वाची संकल्पना व मातंग नेतृत्वाची जडण घडण.

सदरील संशोधन मातंग नेतृत्वाशी संभ्धीत असल्यामुळे नेमके राजकीय नेतुत्व म्हणजे काय नेतृत्व निर्मितीला कोणते घटक कारणीभूत ठरतात, नेतृत्वाचे संकल्पनात्मक विवेचन प्रकरणाच्या पहिल्या विभागात करण्यात आलेले आहे. तर प्रकरणाच्या भागात मातंग समाजाच्या राजकीय इतिहासाचा आढावा घेतलेला आहे. यामध्ये मातंग नेतृत्व निर्माण होण्यास ज्या बाबी सकारात्मक अथवा नकारात्मक ठरल्या त्याची चर्चा करण्यात आली आहे.

प्रकरण चौथे : विधिमंडळातील मातंग नेतृत्वाची कार्य व भूमिका इ. स. २००४ ते २००९

इ. स. २००४ ते २००९ या कालखंडात महाराष्ट्राच्या विधिमंडळात जे मातंग समाजाचे नेतृत्व कार्यरत होते.त्यांच्या कार्य व भूमिकेचा अभ्यास या प्रकरणा अंतर्गत करण्यात आलेला आहे. या मध्ये त्यांनी सभागृहात जे प्रश्न उपस्थित केले त्याचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. मातंग प्रतिनिधीना जर प्रश्न विचारण्यात आला तर त्यासंबंधी त्यांनी कशी उत्तरे दिली याचे स्पष्टीकरण या प्रकरणा अंतर्गत करण्यात आलेले आहे.

प्रकरण पाचवे : विधिमंडळातील मातंग नेतृत्वाची कार्य व भूमिका इ. स. २००९ ते २०१४

इ. स. २००९ ते २०१४ या कालखंडात महाराष्ट्राच्या विधिमंडळात जे मातंग समाजाचे नेतृत्व कार्यरत होते.त्यांच्या कार्य व भूमिकेचा अभ्यास या प्रकरणा अंतर्गत करण्यात आलेला आहे. या मध्ये त्यांनी सभागृहात जे प्रश्न उपस्थित केले त्याचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. मातंग प्रतिनिधीना जर प्रश्न विचारण्यात आला तर त्यासंबंधी त्यांनी कशी उत्तरे दिली याचे स्पष्टीकरण या प्रकरणा अंतर्गत करण्यात आलेले आहे.

प्रकरण सहावे : मातंग नेतृत्वाने मांडलेले प्रश्न व सभागृहाची भूमिका.

या प्रकरणा अंतर्गत इ.स. २००४ ते २०१४ या कालखंडातील मातंग नेतृत्वाने महाराष्ट्रच्या विधिमंडळात जे प्रश्न उपस्थित केले. व संबधित प्रतिनिधीने त्यावर उत्तर दिले यानंतर सभागृहाने त्या प्रश्न सदर्भात काय भूमिका घेतली याचा आढावा या प्रकरणा अंतर्गत करण्यात आलेला आहे. मातंग प्रतिनिधी सभागृहात ज्या भूमिका मांडतात त्यांना किती प्रमाणात न्याय मिळतो हे पाहणे या प्रकरणाचे उद्दिष्ट्ये आहे.

प्रकरण सातवे : निष्कर्ष व समारोप.

इ.स. २००४ ते २०१४ या कालखंडात महाराष्ट्राच्या विधिमंडळात मातंग समाजाचे जे राजकीय नेतृत्व होते. त्यांनी सभागृहात ज्या भूमिका मांडल्या जे प्रश्न उपस्थित केले. त्यावर शासनाने काय भूमिका घेतली य्व्रच्या प्रयत्नांना कितपत यश आले. मातंग प्रतिनिधीनी आपली भूमिका समाधानकारकरित्या मांडली का? या अनुशंगाने जी तथ्ये संकलित केलेली होती. त्यांच्या निर्वचनानंतर जी निष्कर्ष समोर आले त्याची माडणी या प्रकरणा अंतर्गत करण्यात येईल.

संदर्भ ग्रंथसूची :

१) वानखेडे चंद्रकांत, आंबेडकर चळवळीकालीन मातंग समाज

२) भिसे गणपत, मातंग पुढाऱ्याची आवसानघातकी चळवळ

३) कोंडेकर ए. वाय. भारतीय समाज, फडके प्रकाशन कोल्हापूर

४) कुलकर्णी एम. जी. भारतीय समाज व्यवस्था, परिमल प्रकाशन

५) जोशी पी. जी. प्राचीन भारताचा इतिहास, के सागर प्रकाशन पुणे

६) फुले महात्मा, संपा. गंगाधर बनबरे, गुलामगिरी, जिजाई प्रकाशन, पुणे

७) वानखेडे चंद्रकांत, मातंग प्राचीनता आणि सामाजिक परिवर्तनाची दिशा, नेहा प्रकाशन नागपूर

८) वानखेडे चंद्रकांत, मातंग प्राचीनता आणि सामाजिक परिवर्तनाची दिशा

९) वानखेडे चंद्रकांत, मातंग समाजाच्या चळवळी स्वरूप व दिशा

१०) माडे प्रभाकर , मांग आणि त्यांचे मागते

१३) बसवते माधव , मातंग प्राचीनता आणि आधुनिकता

१४) वानखेडे चंद्रकांत, आंबेडकर चळवळी कालीन मातंग समाज

१५) जाधव तुकाराम & शिरपूरकर, भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया खंड

संशोधक	मार्गदर्शक
भोईवार हरिदास मरीबा	प्रा.डॉ. प्रताप पाटील
संशोधन केंद्र	विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक
पीपल्स कॉलेज,नांदेड	राज्यशास्त्र विभाग,
	बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत